**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका.**

जा.क्र./भिनिशमनपा/आस्थापना/ ११६५ /२०२५
दि. ११/ ०८ /२०२५.

**आदेश**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्याच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतियत अधिनियम, २००५ मधील फलम ४(४) (दोन) व कलम ४(५) मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील परिशिष्ट- सीन, नियम ४०(१) (२) (३) (४) व परिशिष्ट-दोन मधील अटी व शर्तीनुसार श्री.राजेंद्र वामन वरळीकर यांचे रजेच्या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे कार्यभार सोपविण्यात येत आहे.

**श्री. मकसूम मुमताज अ. शेख, प्र. कार्यालयीन अधिक्षक, प्रभाग समिती क्र. ०४/-** यांनी यापुढे प्र. सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती क्र.१ या पदाचा कार्यभार पहावा.

**अटी व शर्ती :-**

१.सदर प्रभारी पदाबाबत आपणास कोणत्याही प्रकारे अतिरिक्त वेतन/भत्ते अदा करण्यात येणार नाही
२.सदर प्रभारी पदाबाबत आपण कायमस्वरुपी/पदोन्नतीबाबत दावा किंवा अधिकार राहणार नाही.
३.सदर प्रभारी पदाबाबत आपणास मा.न्यायालयात दाद मागता येणार नाही
४.सदर प्रभारी पदावर कार्यरत असतांना आपणास प्रशासकीय कारणास्तव सोपविण्यात येणारे विविध कामे व कर्तव्य पार पाडणे बंधनकारक राहिल.
५.सदर प्रभारी पदाबाबत आपले काम असमाधानकारक असल्याचे आढळल्यास आपली सदर पदावरील सेवा कोणतीही पुर्व सुचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल.

सदरहू आदेशान्वये बदलीने पदस्थापना करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा राजकीय दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न केल्यास त्याची संबंधित अधिकाऱ्यांच्या गोपनीय अहवालात नोंद घेण्यात येईल. तसेच राजकीय दबावाबाबतची कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम ३ (३) व २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे तो गैरवर्तणूक समजून सबंधिताविरुद्ध शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घेण्यात यावी.

**अनमोल सागर, (भाप्रसे)**
**प्रशासक तथा आयुक्त,**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**प्रति :-**
श्री. मकसूम मुमताज अ. शेख, प्र. कार्यालयीन अधिक्षक,
प्रभाग समिती क्र. ०४

**प्रत :-**
१.सहा.आयुक्त, प्रभाग समिती क्र.०४, भिवंडी मनपा.
२.वेतन लिपीक, आस्थापना विभाग, भिवंडी मनपा.
३.निवड नस्ती (आस्थापना)

प्रत :- **माहीतीस्तव सविनय सादर,**
१.मा.प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे कार्यालय.
२.मा.अतिरिक्त आयुक्त सो.,यांचे कार्यालय.
३.उपआयुक्त (मुख्यालय) यांचे कार्यालय.
४.उपआयुक्त (कर) यांचे कार्यालय.